# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAANS

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, AUGUST 2020 | NO. 8


**पवित्र शास्त्र**

कृपया हा शास्त्रभाग पाठ करा

**प्रभुची स्तुती असो**

**स्तोत्र १३८:१-८**

१) मी अगदी मनापासुन तुझे उपकार स्मरण करीन, अन्य देवांच्या समक्ष तुझी स्तोत्रे गाईन.

२) तुझ्या पवित्र मंदिराकडे वळुन मी तुझी उपासना करीन, तुझ्या दयेमुळे व तुझ्या सत्यामुळे मी तुझ्या नामाचे उपकार स्मरण करीन, कारण तू आपल्या संपुर्ण नामाहून आपल्या वचनाची थोरवी वाढविली आहे.

३) मी धावा केला तो तू त्याच दिवशी ऐकला, तू मला हिम्मत दिली तेव्हा माझ्या आत्म्याला सामर्थ्य झाले.

४) हे परमेश्वरा, पृथ्वीवरील सर्व राजे तुझे उपकार स्मरण करतील, कारण त्यांनी तुझ्या तोंडची वचने ऐकली आहेत.

५) ते परमेश्वराच्या मार्गाविषयी गातील, कारण परमेश्वराचा महिमा थोर आहे.

६) परमेश्वर परमथोर आहे तरी तो दीनाकडे लक्ष देतो, पण गर्विष्ठाला दुरून ओळखितो.

७) मी संकटामध्ये भ्रमत असलो तरी मला तू उत्तेजन देतोस, माझ्या वैऱ्यांच्या क्रोधावर तू आपला हात चालवितोस आणि तुझा उजवा हात माझा बचाव करितो.

८) परमेश्वर माझे सर्व काही सिध्दीस नेईल, हे परमेश्वरा, तुझी दया सनातन आहे. तू आपल्या हाताचे काम मध्येच सोडू नको.

### The Power of the Lord's Presence!

# प्रभुच्या उपस्थितीचे सामर्थ्य

**"... आपला देव परमेश्वर याजवर प्रेम कर, त्याची वाणी ऐक व त्यास धरून राहा, कारण त्यातच तुझे जीवन आहे, त्यातच तुझी आयुर्वृध्दि आहे..."**

**(अनुवाद ३०:२०)**

**- पास्टर सॅम सेल्वा राज**

हा संदेश सर्वस्वी देवाच्या उपस्थितीच्या सर्वसामर्थ्याविषयी आणि ते कसे राखून ठेवावे या संबंधीत आहे. देव त्याच्या लेकरांना त्यांच्यासाठी जीवन जगण्याकरीता कसे सामर्थ्य पुरवितो. याविषयी शास्त्रात अनेक उदाहरणे सापडतात आणि त्या सर्वांमध्ये अधीक वजनदार उदाहरण मोशेच्या जीवनात सापडते.

मोशेची खात्री पटली होती की, त्याच्या जीवनात देवाची उपस्थिती असल्या शिवाय तो जे काही करेल ते निरूपयोगी ठरणार तो जेव्हा देवाशी समोरा समोर बोलला तेव्हा तो असे म्हणाला.... तू जर आमच्या बरोबर येणार नसशील तर आम्हांस पुढे नेऊ नकोस "(निर्गम : ३३:१५) तो असे म्हणत होता, देवा तुझी उपस्थिती मजबरोबर नसणार तर मी कोठेही जाणार नाही. तूं मजबरोबर आहेस याची खात्री झाल्याशिवाय मी एक देखील पाऊल पुढे टाकणार नाही."

मोशे हे जाणून होता, की देवाच्या इस्त्रायल मधील, उपस्थितीने लोकांना इतर राष्ट्रांपासुन वेगळे केले होते. आणि आज येशू ख्रिस्तांच्या मंडळीबद्दल देखील तसेच आहे. अविश्वासणाऱ्यांपासुन आपल्याला कोणती गोष्ट वेगळी करीत असेल, तर देवांचे आपल्या बरोबर असणे. त्याचे नेतृत्व, मागदर्शन आणि आपल्या मध्ये आणि आपल्या मधुन त्यांच्या इच्छेचे कार्य.

मोशेला इतर राष्ट्रांना मागदर्शन कसे प्राप्त होते, त्यांचे डावपेच, त्यांचे सरकार कसे चालवितात किंवा त्यांच्या सेनांना कशा सुचना दिल्या जातात याची पर्वा नव्हती. तो म्हणाला, "आम्ही एका तत्वावरच कृती करतो. आम्हाला या विस्तृत भुमित मार्गदर्शना करिता युध्द करून नंतर तग धरून जीवंत राहण्याकरीता एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे आमच्या सोबत देवाची उपस्थिती असतो."

"आमच्या मध्ये जेव्हा देवाची उपस्थिती असते तेव्हा आम्हांला कोणीही अपाय करू शकत नाही. परंतु त्याच्या अनुपस्थितीत आम्ही असह्य आणि शुन्य ठरतो. या जगातील सर्व राष्ट्रांना त्यांच्या सेन्यामध्ये, त्यांच्या रथामध्ये, त्यांच्या कुशल सैनिकांवर आणि त्याच्या युध्द सामग्रीवर भिस्ति ठेवू द्या आम्ही मात्र आमच्या देवाच्या आमच्या मधील प्रकट उपस्थितीमध्ये मिष्टा बाळवू."

मोशेच्या धाडसी वक्तव्याला परमेश्वराने असे उत्तर दिले, "मी प्रत्यक्ष येईन आयी तुला विश्रांती

*(पान ४ वर .....)*

❖ ❖ ❖ **२०१९ - सुवर्ण महोत्सवी वर्ष** ❖ ❖ ❖

१९६९ पासून शिक्षणाद्वारे जिवांना स्पर्श करणारे

# त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी

मासिक प्रकाशन - इंग्रजी,तमीळ,मल्यालम,तेलगु,हिन्दी,मराठी,कन्नड,बंगाली,गुजराती,उरीया,नेपाली,आसामी,पंजाबी,उर्दु सिंहाला आणि अफ्रिकन



## "... तुझे तो कल्याण करील".

(ईयोब २२:२१).

प्रभु येशू ख्रिस्तामधील माझ्या प्रिय मित्रांनो,

आपल्या प्रभु न तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या अमुल्य नामात तुम्हा सर्वांना विशेष शुभेच्छा. आम्ही प्रार्थना करीत असताना तुम्ही देखील तुमच्या जीवनातील सर्व भागामध्ये देवाचे सामर्थ्य अनुभवित आहात. अशी आशा बाळगीत आहोत.

हल्ली जगातील वेगवेगळ्या देशामधील भिन्न भिन्न विश्वासातील लोकांवर पवित्र आत्मा येत आहे. असे ऐकण्यात येत आहे. आमचे अनेक मित्र आणि मान्यवर जे प्रभु येशू ख्रिस्तापासून दूर अविश्वासणाऱ्यांचे जीवन जगत होते. ते त्यांच्या तारणदायी ज्ञाना जवळ आले आहेत. आणि उघडपणे प्रभु येशु ख्रिस्त त्यांच्या जीवनाचा प्रभु व तारणारा आहे असे जाहीर करीत आहोत. यांच्यामध्ये सिनेसृष्टीतील आणि सक्रीय राजकारणातील व्यक्तींचा देखील समावेश आहे. तेव्हा देवाच्या सर्व लोकांनी जे प्रार्थना करीत आहेत आणि देवाच्या सेवेत आहेत, मग ते कोणत्याही पंथाचे असोत सर्वांनी एकत्रित पणे देशातील प्रतिकुल परीस्थीतीत देखील ज्यांच्या पर्यंत शुभवर्तमान पोहचले नाही त्यांच्या पर्यंत ते पोहचत आहे. त्याबद्दल प्रभु येशु ख्रिस्तांचे आभार मानले पाहिजेत.

आध्यात्मिक जगतात जे काही घडत आहे. ते प्रसार माध्यमांनी ते निर्भिडपणे लोकांसमोर प्रसारीत करावे यासाठी देखील प्रार्थना करणे आवश्यक आहे. परमेश्वर लोकांमध्ये करीत असलेली कृत्ये सामान्यांपर्यंत पोहचत नाहीत. या महिन्यात विषेश करून वर्तमान पत्रे, दुरदर्शन क्रेंद्रे, इंटरनेट व्हॉटस् ॲप या प्रसार माध्यमां करीता प्रार्थना करू या अशासाठी की आध्यात्मिक जगतात. जे चमत्कार आणी ज्या सत्यघटना घडत आहेत.त्या त्यांना लोकांसमोर आणणे शक्य व्हावे. आपल्या प्रभु येशू ख्रिस्तांच्या सामर्थ्यद्वारे लोकांमध्ये अनेक चमत्कार घडत आहेत. आम्ही प्रभु येशु ख्रिस्तांचे अत्यंत आभार मानीत आहोत. यासाठी की आमच्या प्रार्थना योध्यांच्या प्रार्थनामुळे आणि देवाच्या लोकांच्या परिश्रमामुळे कठीण अशा ठिकाणामध्ये देवाचे वचन देणे शक्य होऊ दिले आहे.

या वर्षी जानेवारी ९ तारखेला आम्ही दक्षिण भारतातील मिशनरी क्षेत्रांना भेट देण्यास जात असताना वाटेत राजमार्गावर तिरूवेल्ली या ठिकाणी थोडी विश्रांती घेण्याकरीता एका हॉटेलात गेलो. आम्ही थकलेले असल्यामुळे कॉफी पिण्याचा आनंद घेत होतो. इतक्यात आमच्या शेजारील टेबलाभोवती बसलेल्या कुटूंबाचा प्रमुख आमच्याकडे गंभीरपणे पाहात होता. आणि अचानक उठून माझ्याकडे येऊन मला आलींगन देत अशा शब्दांनी स्वत:चा ओळख करून दिली.

*प्रिय बंधु, सॅम, तुम्ही मला ओळखु शकता का? मी रेव्ह. रामादास तुमच्या नहेम्या बायबल कॉलेज मध्ये १९९२-१९९४ या वर्षात विद्यार्थी होतो. तुम्ही कॉलेजचे व्यवस्थापन पहात होता आणि ख्रिस्तांच्या कळकळीने शिकवित देखील होता. मी त्यावेळेस "Dhina Thanth" या प्रसिध्द दैनिक वर्तमान पत्राच्या कार्यालयात काम करीत होतो. एके दिवशी प्रभु येशू ख्रिस्ताच्या सेवाकर्याबद्दलचे सार्वभौमत्व समजावून सांगत असताना, तुम्ही सरकारी कार्यालयात लाभदायक नोकरी करीत असताना प्रभु येशुने तुम्हाला पूर्णवेळ सेवेसाठी कसे पाचारण केले, आणि तो तुमचा कशा प्रकारे उपयोग करून घेत आहे. आणि तुमच्या जीवनातील यशस्वी ते बद्दल सांगत होता. प्रभुने*






**CHIEF EDITORS**
Pastor S. Sam Selva Raj
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M. Phil., B.Ed.

**ADVISORY BOARD**
Adv. Jose Abraham
Adv. N. Balaji, B.Com., B.L.
Dr. S. Rabinder Boaz, M.S.
Er. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM)
Aud. K. Puratchivendan, M.Com., B.L.
Bro. Rajeswaran Samuel, B.Com.

**PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
**Echo of His Call Printers**
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
**Phone :** (+91-44) 2852 8282
2852 9293, 2854 7766
**Email :** sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
**Websites :**
www.echoofhiscall.org
www.echoofhiscall.com

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners Village English High School Crusades 100 Prayer Warriors Community Development

*माझ्या अंत:करणाला स्पर्श केला आणि मी देखील त्याच्या धाडसी अशा पूर्णवेळ सेवा कार्यात यावे असे त्याला वाटत होते. त्यानुसार मी माझा अभ्यासक्रम पूर्ण केला, पदवी संपादन केली आणि माझी वर्तमानपत्राच्या कंपनीतील नोकरी सोडून देऊन धीटपणे प्रभु येशुच्या सेवाकार्यात उडी घेतली. आता देवाने मला आशीर्वादीत केले आहे. आणि वरीष्ठ पाळकाच्या पदावर उंचावले आहे. त्याने मला उपासनेची, रहाण्याची जागा, वाहन इत्यादी सर्व पुरविले आहे. माझ्या सर्व गरजा तो पुरवीत आहे. मी माझ्या पत्नी आणि मुलींसह पूर्णवेळ सेवा करीत आहे. नहेम्या बायबल कॉलेजच्या सेवेबद्दल देवांची स्तुत असो !!*

*आम्ही १८८० सालापासुन इंग्रजी, तामिल आणि हिन्दी अशा तीन भाषांमध्ये "बायबलकोर" हा पत्रव्यवहारा द्वारे करण्यात येत असलेला "तुमच्या करिता नवीन जिवन" या पुस्तकातुन अभ्याक्रम घेत आहोत हे तुम्हाला ठाऊक असेलच. या अभ्यासक्रमाच्या द्वारे भारतातील आणि शेजारील देशातील हजारो लोक आशिर्वादीत झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना आम्ही प्रमाणपत्र देतो. हा अभ्यासक्रम पथ भेद न बाळगता हजारो जणांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. आम्हांला आंधप्रदेशातील बहिण अन्नपुर्णा कडून प्राप्त झालेले पत्र त्यात फेरफार न करीता देत आहोत.*

*प्रभु येशू ख्रिस्तांच्या नामात शुभेच्छा. मी एम. अन्नपुर्णा, मला "बायबलकोर", तुमच्याकरीता नवीन जीवन " पुस्तिका" मिळाली आहे. मिळाल्याबद्दल मला अतिशय आनंद झाला आहे. हा अभ्यासक्रम अतिशय उपयुक्त होता, त्यातील शब्द आणि वाक्ये समजण्यास आणि शिकण्यासाठी अतिशय सोपी होती.*



*हा अभ्यासक्रम करताना मी अतिशय आनंदीत आहे. खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीने कसे वागा-वर्तावे मला समजले. ती सत्ये प्रत्येक वेळी अनुसरण्या करीता मी माझ्या मनात जतन केली आहेत. मी प्रचंड उत्साहाने अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. या पत्रासोबत उत्तरपत्रिका पाठवित आहे. हा शास्त्राभ्यासक्रम पुर्ण केल्यामुळे आशिर्वादीत असल्यासारखे वाटत आहे. मला हा अभ्यासक्रम पाठविल्याबद्दल आभार मानीत आहे.*

*मला तुमच्या पत्रांसोबत पाठविलेले २०२० साठीचे अभिवचन कार्ड आणि शास्त्रवाचन प्लॅन (२०२०) मिळाले आहेत. ते मिळाल्याबद्दल आनंद झाला त्या सर्व साहित्यांबद्दल आभारी आहे.*

*या नवीन वर्षाच्या सुरवातीपासुन २०० रूपये प्रत्येक महिन्याला पाठविण्याची माझी इच्छा आहे. मनि ऑर्डर ने पैसे पाठवित आहे. कृपया स्विकार करा.*

*मला आणि माझ्या कुटूंबाला पाठविलेल्या ख्रिसमय आणि नुतन वर्षाच्या शुभेच्छांबद्दल धन्यवाद, तुमच्या प्रार्थनाबद्दल आभारी आहे.*

*तुम्हाला आणि तुमच्या कुटूंबाला ख्रिसमस आणि नुतन वर्षाच्या शुभेच्छा देव करो आणि तुम्हास तुमच्या कुटूंबाला आणि तुमच्या कार्यावर सर्व प्रकारे आशिर्वाद देवो .*

*परत एकबार ख्रिस्मस आणि नुतन वर्षाच्या शुभेच्छा कृपया माझ्या विवाहा करिता, मला चांगल जीवन साथी मिळावा याकरीता प्रार्थना करा.*

*आम्ही देखील तुमच्या करीता आणि सेवे करिता प्रार्थना करु आमचे तुमच्यावर प्रेम आहे. धन्यवाद*

*एम. अन्नपुर्णा*

आम्ही केरळ मधील एक वयस्कर विद्यार्थी बंधु मोहन दास बांसेल ज्यांनी "नेहम्या बायबल कॉलेजचा" थियॉर्लाजीकल अभ्यासक्रम पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येणारा पुर्ण केला त्यांची ओळख करून देवू इच्छितो, त्यांच्या द्वारे आम्हांला हल्ली पाठविलेले पत्र प्रसिध्द करीत आहोत.

*मी "एको ऑफ हिज कॉल" सेवा कार्याच्या अंतर्गत असलेल्या नहेम्या बायबल कॉलेजचा पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेला थियॉलॉजीकल बायबल अभ्यासक्रम सुरू केला. खरे तर माझ्या अंत:करणात ज्योत पेटली. या अभ्यासक्रमाद्वारे मी बायबलचा अधीकाधीक अभ्यास करण्याचे ठरविले. आणि मी एका मागुन एक अशी सातही पुस्तके अभ्यासली मला जाणवले की नवीन जीवनात ज्ञानाला महत्तव नाही. अभ्यासक्रमातील पहिल्या सहा पुस्तकांच्या द्वारे मला पुष्कळ से नवीन प्रकटीकरण आणि शास्त्राबद्दलचे ज्ञान प्राप्त झाले. मला खरा मार्ग कळला आणि नवीन जीवन मिळाले. विषेश प्रकारे या अभ्यासक्रमाद्वारे थियॉलॉजी बद्दल असलेल्या माझ्या पूर्वीच्या स्थितीपेक्षा अधीक मार्गदर्शन मिळाले.*



*चर्च मंडळी विषयीच्या शेवटच्या नव्या पुस्तकाने मला वचनांचा अर्थ कसा काढावा आणि संदेश कसा द्यावा याविषयीचे पुष्कळ ज्ञान प्राप्त झाले. त्यामुळे मी "एको ऑफ हीज कॉलच्या" नेहम्या बायबल कॉलेज बद्दल प्रभु परमेश्वराची स्तुती करीत आहे. या अभ्यासक्रमाने मला माझ्या जीवनाचा (योग्य मार्ग) दाखविला*

*मास्टर एस सॅम सेल्वा राज जे या सेवा संस्थेचे संचालक आहेत. त्यांनी मला उत्तेजन दिले व पुष्कळ मदत केली आणि मंडळीचा खरा पुढारी कसा असावा हे मला त्यांच्या जीवनशैलीमुळे कळून आले. या सेवाकार्यात डिसेंबर २०१९ मध्ये भेट दिली. त्या दिवसापासुन माझे स्वप्न खरे ठरले आणि माझी जीव आनंदीत झाला आणि देवाचा कोकरा जो ख्रिस्त त्याला हाल्ले लुया.... म्हटले. पास्टर सॅम यांनी मला सर्व प्रकारच्या आराधना सभामध्ये भाग घेण्यास आणि नेतृत्व करण्यास परवानगी दिली. आणि त्यांच्या प्रेमाद्वारे उत्तेजन दिले. देव राज्याच्या वाढीसाठी ते उत्तम कार्य करीत आहेत. त्यांच्या प्रभु करीता असलेला अद्भुत अशा समर्पितपणा आणि समर्पित सेवा व्यक्त करण्यास मजकडे योग्य असे शब्द नाहीत. माझ्या प्रत्येक भेटीत मला अधीकाधीक बळ आणि ज्ञान प्राप्त होत गेले. देव राज्याच्यावाढी बद्दलचे उत्तम उदाहरण म्हणजे "एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्री" आणि पास्टर सॅम सेल्वा राज हे होत.*

*मी पास्टर एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या टीमला शुभेच्छा देत प्रार्थना करितो, की देवाने त्यांच्या हायस्कूल आणि बायबल कॉलेज सहीत त्यां सर्वांना सर्व प्रकारचे आशीर्वादीत करावे.*

*पुष्कळशा प्रिती आणि प्रार्थनेसहित*

*मोहनदास बासेल पी.*

प्रभु परमेश्वराने आम्हा मुख्य मंडळीतील सभासदांना २५ जानेवैरी २०२० रोजी पंडापाई या ठिकाणी जाऊन मंडपाचा सण साजरा करण्यास

मदत केली.

प्रियानो हे लांबलचक संपादकीय वाचल्याबद्दल आभार मानीत आहे.देव आनिर्वाच्य अशा प्रकारे आम्हांस आशिर्वाद देत आहे, आणि आमचा उपयोग करून घेत आहे. कृपया आमचे सर्व सहकारी, सहसंपादक, प्रार्थना, भागीदार, आजीवन भागीदार, महान सेवेतील भागीदार सर्व वर्गणीदार, पाळक वर्ग, मिशनरी, शाळेचा स्टाफ, बायबल कॉलेजचा स्टाफ, कार्यालयीन स्टाफ, मुद्रणालयातील स्टाफ, अशा सर्वासाठी प्रार्थना करीत. राहा आणि एको ऑफ लीज कॉलच्या सर्व कार्यक्रमांना ५१ वर्षे हातभार लावित आलेल्या सर्वांसाठी प्रार्थना करा.

आम्ही " एको ऑफ लीज कॉल" सेवा कार्याकरीता आणि त्यांच्या जगभरातील सहकार्याकरीता प्रार्थना करण्यासाठी १ मे २०२० हा दिवस राखून ठेविला आहे. या दिवशी आम्ही सर्व जण आमच्या मुख्य मंडळीत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्राथने करीता एकत्रित येणार आहोत. आम्ही आमच्या जगभरातील सर्व सहकार्यांना आणि मित्रांना दिवस एको ऑफ हीज कॉल सेवे करीता आणि अशा इतर सेवा कार्याकरीता १ मे २०२० हा प्रार्थना दिवस पाळावा अशी विनंती करीत आहोत. प्रार्थने करीता मुद्दे ज्या सर्वांना हवे असतील. त्या सर्वांना आम्ही पाठवू.

ख्रिस्त येशु मध्ये तुमचा दास
एस. सॅम सेल्वा राज

---

*(पान १ वरुन .....)*

देईन" (निर्गम ३३ :१४) किती हे आच्छर्यकारक विशावस ठेवण्यास कठीण असे आश्वासन! येथे विश्रांती करिता जो इब्री शब्द आहे, तो सुखदायक, निवान्त आराम" असा आहे. देव म्हणत लेता, "तुला कोणत्याही शत्रुला किंवा परिक्षांना सामोरे जावे लागले, तरी तुला मजमध्ये नेहमीच सर्वदा शांत विश्रांती मिळेल.

याबद्दल विचार करा. जर एखाद्या मंडळीत देवाची स्पष्ट अशी उपस्थिती असेल, तर तेथे गडबड गोंधळ, घाम गाळणे किंवा प्रयत्नाची पराकाष्टा अशी कोणतीही गोष्ट नसणार आराधना सभा केवळ तीन गीते, दानार्पण आणि थोडक्यात संदेश अशा घाईने संपणार नाही. तर तेथे अविचलित शांतता निवान्त आराम असेल. आणि त्या ठिकाणी आत येणाऱ्या प्रत्येकाला तो जाणवेल.

अर्थातच, याचा अर्थ असा होत नाही की मंडळी मोठ्या आला जातील खुली किंवा ज्वलंत आराधना अनुभवु शकत नाही. उलट माझा असा विश्वास आहे की, त्या गोष्टी बहुतेक दा विश्रांती घेत जर सगळ्या लोकांचा तो परिणाम आहे. मंडळीच्या ज्या कार्यकारी मंडळात देवाची उपस्थिती आहे. ती जिवंत राहणार हालचाल करणार आणि सर्व समयी अत्यंत आत्मचिंतनाने आराधना करणार.

हे सर्व व्यक्तिमत्व प्रत्येक ख्रिस्ती जनांसाठी खरे आहे. तुमच्या जीवनात येशू ख्रिस्तांची उपस्थिती असेल, तर तुम्ही देवाचा दैवी क्रमात अनुभवाल तुम्हाला शांती आणि आबिलतो, सहित चिंता किंवा काळजी नसणार, मार्गदर्शक करिता पुढे मागे धावपळ करावी लागणार नाही. पाया उळमळत आहे असे वाटणार नाही. सर्व काही देवाच्या नियंत्रणाखाली आहे. हे जाणून तुम्ही आरामात जीवन जगाल.

देवाच्या उपस्थितीमुळे त्याला अनुसरजा त्यांच्या जीवनात आशिर्वाद प्राप्त झालेल्या जुन्या कटारातील उदाहरणाचा विचार करा.

अब्राहमाच्या जीवनात देवाची उपस्थिती इतकी स्पष्ट प्रगट होत होती, की त्यांच्या सभोवताली असलेल्या परराष्ट्रीयांना देखील त्यांच्या जीवनातील आणि स्वत:च्या जीवनातील फरक जाणवत होता.

".... अभिमलेख व त्याचा सेनापति पीकोळ हे अब्रालमास म्हणाले. जे काही तु करतोस त्यांत देव तुझ्याबरोबर आहे. (उत्पत्ति २१:२२) हा परराष्ट्रीय राजा म्हणत होता. "अब्राहम तुझ्याबाबतीत काहीतरी वेगळे आहे. देव तुझे मार्गदर्शन करितो, राक्षस करितो आणि तूं जेथे कोठे जातो तेथे तुला आशीर्वाद देतो."

देवाने यहोशबाला

अभिवाचन दिले देव त्याजबरोबर असल्यामुळे त्यांच्या विरोधात कोणीही शत्रुच टिकावे लागणार नाही. तुझ्या हयातील तुझ्यापुढे कोणाचाहि टिकाव लागणार नाही, असा मोशेच्या बरोबर मी राहिलो तशाच तुझ्याबरोबर मी राहीन., मी तुला अंतर देणार नाही, तुला टाकणार नाही. खंबीर हो, हिंमत धर.... कारण तुला कोणीही शत्रु इजा करू शकणार नाही.

देंव गीदोनास बोलला बळवंत विटा, परमेश्वर तुझ्याबरोबर आबे. तू आपल्या ह्या अंगबलाच्या जोरावर जा, आणि इस्त्राएल लोकांस मीधानापासुन सोडीव.... (शास्त्रे ६:१२,१४ "अंगबलाच्या जोरावर या शब्दाचा बाराव्या वचनातील," "परमेश्वर तुझ्या बरोबर आहे" या वाक्याशो संबंध आहे. तुम्ही पाहात आहा काय? देव काय म्हणत आहे? "गीदोना तुझ्यामध्ये जे बळ आहे ते इतके सामर्थ्यशाली आहे की ते इस्त्रालय लोकांस सोडतील आणि ते बळ माझी उपस्थिती वचन गीदोनास भित्रा असे दर्शउॅति आहे. तर मग देव त्याला "हे बलवान वीरा असे का बोलत आहे"? ते अशासाठी देव त्याला सिध्द करून दाखवू इच्छित होता. परमेश्वर व्यक्तीबरोबर असल्यावर ती व्यक्ती काय करू शकते हे.

देवाने थिर्मयाल चेतावणी दिली की संपुर्ण राष्ट्र त्याज विरूध्द होईल व त्याचे भविष्य नाकारतील, तरी देखील त्याला अभिवचन दिले, ".... ते तुझ्याबरोबर लढाई करतील तरी तुजवर वरचढ होणार नाहीत, कारण तुझा बचाव करण्यास व तुला सोडविण्यास मी तुझ्या बरोबर आहे."

देव यशयास बोलला, देव ज्यावर सर्वांवर प्रिती करितो,त्या सर्वांना तो विशेष असे अभिवचन देतो: "भिऊ नके," कारण मी तुला सोडविले आहे, मी तुला तुझ्या नावाने हाक मारिली आहे, तू माझा आहेस तू जलातून चालशील तेव्हा मी तुजबरोबर असेन, नद्यांतून जाशील तेव्हा त्यातुन बुडवयाचा नाहीत., अग्नीतून चालशील तेव्हा तूं भाजावयाचा नाहीस, ज्याला तुला पोळावयाचनी नाही. कारण मी परमेश्वर तुझा देव आहे...... मी तुजवर प्रेम करितो ...... भिऊ नको, कारण मी तुझ्याबरोबर आहे.... (यशया ४३:१-५)

देव म्हणत होता, माझ्या उपस्थितीमुळे तूं पुरातुन किंवा अग्नितून जाऊ शकतो आणि तु वाचशील. तू वाचणार असे नाही, तुला आशिर्वाद प्राप्त होईल

*(पान ६ वर .....)*

**The details of our Bank Accounts are given below. Please inform us the details of your remittances.**

| Bank | Branch | Name | IFSC Code No. | Account Number |
|---|---|---|---|---|
| 1. STATE BANK OF INDIA | Triplicane, Chennai -5 | S. Sam Selva Raj | SBIN 0000249 | 102329 34679 |
| 2. ICICI BANK | Anna Salai, Chennai -2 | Echo of His Call | ICIC 0006038 | 6038 05022319 |

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार

# प्रार्थना विनंत्या

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

१९ मार्च २०२० ते १८ एप्रिल २०२०

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## देव कार्यरत आहे !
### स्तुति करीता मुद्दे

**१९ मार्च** : २८ जानेवारी रोजी आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन** शाळेचा क्रीडा महोत्सव दिन देवाने आशिर्वादीत केला.

**२० मार्च** : १ फेब्रुवारीला **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन** शाळेचे वार्षिक स्नेह संम्मेलन देवाने आशीर्वादीत केले.

**२१ मार्च** : आमच्यां मुद्रणालयात १६ भाषांमध्ये छापून सर्व मिशन क्षेत्रांमध्ये पाठविण्यात आलेले शुभवर्तमान साहित्य देवाने आशिर्वादीत केले.

**२२ मार्च** : **जागतिक संजीवना करिता** प्रार्थना करित असलेल्या आमच्या १०० प्रार्थना योध्यांची सेवा देव आशीर्वादीत करीत आहे.

**२३ मार्च** : सर्व राज्य समन्वयंकाकरिता देवाची स्तुती करू या

**२४ मार्च** : आमच्या मुख्य मंडळीतील स्त्रियांची सहभागिता देव आशीर्वादीत करीत आहे.

**२५ मार्च** : आमच्या बायबलकोर -पायाभुत अभ्यासक्रम, आणि थियॉलॉजीकल अभ्यास क्रमांकरीता देवाची स्तुति करू या.

**२६ मार्च** : देवाने आमचे वरीष्ठ पाळक पास्टर सॅम. सेल्वा राज यांच्या प्रवास फेऱ्या आशीर्वादीत केल्या.

**२७ मार्च** : देवाने प्रभावी व्याख्याते पुरवुन आमच्या नेहम्या बायबल कॉलेजला आशीवार्दीत केले आहे.

**२८ मार्च** : देवाने आम्हांस चांगला कार्यालयीन स्टाफ पुरविला आहे.

**२९ मार्च** : आमच्या मुख्य मंडळीत देवाने आणखीन प्रार्थना योध्दे दिले आहेत.

**३० मार्च** : आमच्या सेवा कार्याल प्रार्थनेद्वारे आणि स्वेच्छादानांद्वारे आधार असलेल्या सर्वांकरिता देवाची स्तुती करू या.

**०१ एप्रिल** : देवाने मागील महिन्यातील आमचे सर्व सेवाकार्य आशीर्वादित केले.

**०२ एप्रिल** : आमच्या मुख्य आणि शाखा मंडळयांमध्ये अनेक आत्मे सहभागी झालेत.

**०३ एप्रिल** : देव आमचे वरीष्ठ पाळक पास्टर सॅम् सेल्वाराज आणि त्यांच्या कुटूंबाचे सर्व दुष्ट शक्तीपासुन रक्षण करीत आहेत.

## प्रार्थने करीता मुद्दे

**०४ एप्रिल** : देवाने या महिन्यातील **एको ऑफीस कॉल** सेवाकार्याच्या सर्व आर्थिक गरजा पुरवाव्यात.

**०५ एप्रिल** : शासकीय शालांत परीक्षेस बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्याकरीता प्रार्थना करू या.

**०६ एप्रिल** : १ मे २०२० रोजी आयोजित "ॲल्युमिनी" सभेकरीता प्रार्थना करा.

**०७ एप्रिल** : चिन मध्ये आणि इतरत पसरलेला करोना संसर्गजन्य रोगाचे समुळ उच्चांटन व्हावे याकरीता प्रार्थना करू या.

**०८ एप्रिल** : १३ जुन रोजी होणाऱ्या **नहेम्या बालबल कॉलेजच्या** विद्यार्थ्यांच्या दिक्षांत उपासने करीता प्रार्थना करा.

**०९ एप्रिल** : २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता देवाने विद्यार्थी द्यावेत.

**१० एप्रिल** : आमच्या मुख्य मंडळीत आणि शाखा मंडळ्यांत होणाऱ्या उत्तम शुक्रवार आणि पुनरूथांत दिनाच्या उपासनांन करीता प्रार्थना करा.

**११ एप्रिल** : सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या रक्षणाकरीता प्रार्थना करू या.

**१२ एप्रिल** : **एको ऑफ कॉल** मुख्य मंडळीत दर रविवारी होत असलेल्या सात उपासनाकरींता प्रार्थना करा.

**१३ एप्रिल** : जगभरातील सर्व कैद्यांच्या तारणाकरीता प्रार्थना करा.

**१४ एप्रिल** : **एको ऑफीस कॉलच्या** मुख्या कार्यालयाच्या विभागील लोकांच्या तारणाकरीता प्रार्थना करा.

**१५ एप्रिल** : उर्दु भाषेतील मासिकांचे सहसंपादक बंधु सुरज कुमार चंदानी यांच्या आणि त्यांच्या कुटूंबीयांच्या प्रकृती स्वास्था करीता प्रार्थना करा.

**१६ एप्रिल** : जगभरातील सर्व सिमा सर्वक्षण दलांन करीता आणि सरकारच्या उत्तम प्रशासनाकरीता प्रार्थना करा.

**१७ एप्रिल** : सर्व भारतीय पुढारी, राष्ट्रपती, पंतप्रधान, सर्व राज्यांचे राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्याकरीता प्रार्थना करू या.

**१८ एप्रिल** : जागतिक शांततेकरीता प्रार्थना करू या.

## महान सेवा कार्य भागीदारांची - कार्य केंद्रे

● **केरळ**-त्रिवेंद्रम, कोट्याम, थीरूवेल्ला, एर्नाकुलम ● **तामिळनाडू**-त्रिची, कोईम्बतूर, मदुराई, नागरकोईल, असारी पाल्लम, सेलम ● **पंजाब**-लुधीयाना ● **मध्यप्रदेश**-भोपाळ ● **जम्मू-काश्मीर**-उधामणूर ● **उत्तर प्रदेश**-लखनऊ ● **गुजराथ**-अहमदाबाद ● **बिहार**-झारखंड ● **पश्चिमबंगाल**-कोलकत्ता ● **नागालॅण्ड ओरिसा**-नयागड ● **आंध्रप्रदेश**-विशाखापट्टनम ● **महाराष्ट्र**-मुंबई ● **पॉण्डेचरी** ● **पाकिस्तान** ● **श्रीलंका** ● **बांगलादेश** ● **नेपाळ**

*(पान ४ वरून.....)*

आणि त्या सर्वांद्वारे तुजवर कृपा होईल, कारण तुजबरोबर माझी उपस्थिती आहे.!"

जुन्या करारांतील हे उतारे मृतवन अशा गोष्टी नाहीत. ते आपल्या जीवनात परमेश्वाराची उपस्थिती शोधण्यास उत्तेजन देण्यास आणि विनंती करण्याकरीता आहेत. देवाच्या उपस्थितीने आब्राहाम, येहोशबा, गीदोन चिर्मया, यशया आणि सर्व इस्त्रालय करीता जे केले त्याबद्दल आपण त्यांचे आभार मानु शकतो. तसेच आपल्या प्रत्येकाकरीता देवाच्या उपस्थितीत त्याबद्दल प्रबळ अशी साक्ष आहे. जीननाला मार्गदर्शन केले, ००००००० दूर केली, दरवाजे खुले केले, ऱ्हदगे बनविले आणि आपणांस निर्भय केले.

हे माझ्या जीवनात खरे झालेले मी अनुभविलेले आहे. तुम्ही कदाचित म्हणाल, "तुम्ही फुशारकी मारीत आहात!" नाही - ते सत्य आहे, माझ्या उपस्थिती शिवाय त्याची उपस्थिती मजबरोबर रहात आलेली आहे.

दहा वर्षापूर्वी आम्ही जेव्हा मंडळीची सुरूवात केली, त्यावेळी आम्ही जे काही करीत होते त्यामश ख्रिस्ताची उपस्थिती दिसून येत होती. मला आठवते उपासने करिता चित्रपट गृहाच्या शोधार्थ एका निर्मात्याच्या कार्यालयात गेलो. त्याच्या सेक्रटरींनी आणि स्टाफनी माझा उपहास केला. त्यांच्या शब्दांनी आणि वागण्याच्या वृत्तीने माझी खात्रीपटली की, माझ्या सारख्या नम्र सेवकाला त्यांना भेटण्याची परवानगी मिळणार नाही. खरेतर मला वाटले ते मला ढकलून कार्यालयाच्या बाहेर काढतील. परंतु तेवढ्यात ते निर्माते त्यांच्या खोलीतून बाहेर आले, मला पाहून त्यांनी त्यांच्या खोलीत आंत येण्यास आमंत्रण दिले.

पुढील अनेक आठवडयांच्या भेटीत आम्ही एकमेकांना चांगले ओळखू लागलो. काही वेळा ते म्हणत, "मला ठाऊक नाही, मी तुमच्या बरोबर इतका वेळ का खर्च घालवित आहे?" माझ्या भेटीची वेळ अगदी व्यस्त आहे. परंतु मी ज्या ज्यावेळी त्यांच्या कार्यालयात जात असे, त्यांचे सेक्रटरी मला सर्वांच्या पुढे आत पाठवित असत, असे बोलून मी पातेलक साहेब तुमची वाट पाहात आहेत"

सरतेशेवटी त्या व्यक्तिने त्यांची प्रसिध्दीस असलेले चित्रपटगृह उपासना घेण्याकरिता विकले. विक्रीच्या कागदपत्रांवर सही करीत असताना ते म्हणाले, "मला ठाऊक नाही, की मी हे का करीत आहे?" केवळ देवाची उपस्थितीच त्यांनी ती इमारत आम्हाला विकण्यामागचे कारण होते.

देव इतर लोकांचे मन देखील बदलत असल्याचे मी पाहिले. आमच्या शेजारील इमारतीचा मालक आम्हाला त्याची इमारत जोड इमारत करण्याकरीता विकण्यास तयार नव्हता. परंतु कालांतराने तो माझा मित्र झाला, आणि त्याने ती इमारत आम्हांला विकली नेहमीच तो बोलत असे, "तिथे वर कोणीतरी तुझ्या करीता कार्य करीत आहे."

हेच देवाच्या उपस्थितीचे सामर्थ्य. सर्व ख्रिस्तीजन देखील अशी साक्ष देऊ शकतात. "देवाच्या माझ्याबरोबर उपस्थितीने महान अशा गोष्टी घडवून आणल्या आहेत!"

आपल्या जीवनात देवाची उपस्थिती येऊ देण्याकरीता आणि ती अबाधित राखण्याकरिता एक अट जोडलेली आहे.

आपल्या जीवनात त्याच्या उपस्थिती करिता देव एक अट जोडीत आहे. ती अट २ इतिहास १५ अध्यायात सापडते. अगोदरच्या अध्यायात आसा राजाने यहुदाच्या सैन्याचे नेतृत्व करून दश लक्ष पुरूषाची सेवा व तिनशे रथ अशा कुशी सेनेचा फडाल केला. तरी देखील आसा राजाने साक्ष दिली, की परमेश्वाच्या उपस्थितीमुळे शत्रुची पांगापांग झाली.

आसाने देवाची प्रार्थना करून म्हटले, सबळांच्या विरूध्द निर्बलांचे साहाय्य करणारा तुजवाचून अन्य कोणी नाही. हे आमच्या देवा, परमेश्वरा, आमचे सहाय्य कर, आमची भिस्त तुजवर आहे. आम्ही तुझ्या नामावर भरवसा ठेवून या समुहाशी सामना करण्यास आलो आहोत.... तेव्हा परमेश्वराने आसा व यहूदी यांच्यापुढे कुशी लोकांस असा मार दिला की ते पळून गेले."(२ इतिहास १४:११-१२)

आसा त्याच्या सैन्यासह मोठ्या जयोस्तवाने जेव्हा परत शलेमास परतला, तेव्हा अजऱ्या त्यांना येरूशलेमच्या वेशीवर देवा चा असा निरोप घेऊन भेटिस गेला. ".... हे आसा .... श्रवण कर, तुम्ही त्यास सोडाल तर तो तुम्हांस सोडील, बहुत काळापर्यंत इस्त्राएलांस खऱ्या देवाची ओळख नव्हती, ...... पण ते आपल्या संकटावस्थेत इस्त्राएलाचा देव परमेश्वर याजकडे वळून त्याला शरण गेले, तेव्हा तो त्यांस पावला" (२ इतिहास २५:२-४)

तुमच्या जीवनात देवाची उपस्थीती येण्याकरीता आणि ती आबाधीत राखण्याकरीताचे रहस्य येथे आहे. देवाने आसाला अतिशय स्पष्टपणे काहीही राखून न ठेवता आठवण करून दिली. "आसा तुला हा विजय कसा प्राप्त झाला. ते विसरू नको. तू संपुर्ण मनाने माझा धावा केला, संकटात असताना मजकडे पूर्णपणे वळलास, आणि मी माझी उपस्थिती तुजकडे पाठविली. माझ्या उपस्थितीने तुझ्या शत्रूला पळवून लावले!"

आता अजऱ्या आसाला सांगत आहे, "तुं सत्येवर येण्याच्या अगोदर राज्याची स्थिती कशी होती हे तुला आठवते का? सर्व काही नियंत्रणाच्या बाहेर होते, कायदा नव्हता, मार्गदर्शन नव्हते, नितीशिक्षण नव्हते. प्रत्येक जण स्वत:च्या इच्छेप्रमाणे वागत होता!"

आजकालच्या अनेक ख्रिस्ती कुटूंबाचे हुबेहुब चित्र आहे. सर्व गोष्टी बिघडलेल्या विस्कळीत, अधिकार, शांती, विश्रांती याचा आभाव दिसून येतो. प्रत्येक जण स्वेच्छेनुसार वर्ततो. अशी अनेक कुटूंबे गंभीर परिस्थीतीत आहेत.

तरी अशी स्थिती असु नये. कोणतेही ख्रिस्ती गृह अकार्यक्षम असु नये. देवाची अभिवचने नबदलणारी अशी आहेत. आणि त्याचे शब्द प्रतिज्ञा करतात. "तुझ्या उर्वरीत आयुष्याच्या दिवसात, जो पर्यंत तू मला शोधीत राहशील - मी नेहमीच तुला पावेन.

ही गुंतागुंत असलेली थियॉलॉजी नाही (ईश्वर परिविज्ञान) जर पति आणि पत्नी किंवा दोघांपैकी एक देवाला शोधीत आहेत तर त्यांच्या घरात त्रास असण्याची आवश्यकता नाही किंवा बेकायदेशीरपणा असण्याची आवश्यकता नाही. दोघांपैकी जो कोणी देवाला शोधील त्याला किंवा तीला त्याची उपस्थिती प्राप्त होईल.

"....... तो तुम्हांस पावेल!" पावेल या शब्दाकरिता इब्री शब्द, "मारसा" म्हणजे त्याची उपस्थिती आशीर्वाद देण्यास पुढे येत आहे. थोडक्यात, हे वचन आपणांस सांगते, "संपुर्ण ह्दयाने देवाचा शोध करा, आणि त तुमच्याकडे त्याची उपस्थिती येईल. अर्थात, त्याची उपस्थिती तुमच्या जीवनातून बाहेर पडणारे सामर्थ्य असेल."

देवाच्या वचनांनुसार देवाची खात्रीपूर्वक उपस्थिती आपल्या सोबत आसण्यासाठी देवाला शोधीत राहावे ही आपली काळजी असली पाहिजे.

देव त्याच्या कृपेचा करार प्रत्येक विश्वासनाऱ्यांबरोबर करितो. हा करार अशा अभिवचनांमध्ये (मुर्तस्वरूपात अशा) आहे.

"देवाने आपली सर्व दुष्कर्मे ख्रिस्तावर लादली." येशू आमच्या करीता शाप असा झाला."तो आंम्हास सोडणार नाही किंवा टाकणार-त्यागणार नाही."

तसेच जे संपुर्ण ह्दयाने देवाला शोधण्याचा निश्चय करतात अशांना तो विशिष्ट असे विशेष आश्वासन देखील देतो. त्यापैकी एक म्हणजे देवाच्या

उपस्थितीचा करार. हा करार अतिशय कडक अशा अटींवर आहे.वचन अगदी स्पष्ट करते की, जर आपण या कराराच्या अटी पाळल्या तर आपण आश्चर्यकारक - अविश्वसनीय अशी देवाची उपस्थितीचा आशिर्वाद आपल्या जीवनात अनभवु आणि हे केवळ तारणासंबंधातील प्रश्नासंदर्भात संबधीत आहे असे नाही. तर ते देवाचा अशा प्रकारे शोध घ्यावा की त्यांची भयजनक उपस्थिती आपल्यावर ओतली जावी आणि ती इतर सर्वांना कळावी आणि दिसावी.!!

देवाने त्याच्या उपस्थितीचा हा करार एका निवानी संदेष्ट्याच्या द्वारे इस्त्रालयाचा मुख्ययाजक एली यांजकडे पोहचविला. त्यावेळी एलीचे अध:पतन झालेले होते. देव त्याजशी पापाला परवानगी देण्याच्या आणि संमजोता करण्याच्या विरूध्द बोलत होता, त्याला चेतावणी देत होता. परंतु एलीने परमेश्वराच्या प्रत्येक शब्दांकडे दुर्लक्ष केले. आणि आता हा निनावी संदेष्टा एलीला बोलला "इस्त्रालाचा देव परमेश्वर म्हणतो, तुझे घराणे व तुझ्या बापाचे घराणे मजसमोर निरंतर चालू राहील असे मी म्हटले होते खरे, पण आता परमेश्वर म्हणतो असे माझ्या हातुन न घडो, कारण जे माझा आदर करीतात त्यांचा मी आदर करीन जे मला तुच्छ मानीतात त्याचा अवमान करीन.! (१ शमुवेल २:३०)

"अवमान होईल म्हणजे देव त्यांची उपस्थीती काढून घेतो याचा अर्थ असा नाही की त्या व्यक्तीला शिक्षा दिली तर उलट आता त्याला किंवा तिला स्वत:च्या शारीरीक शक्तीवर चालावे लागणार. देव ऐलीला सांगत होता. " ऐली तुजवर मेहर नजर करण्यासाठी मी तुला आशिर्वाद देऊ इच्छीत होतो. परंतु पाप अगदी सहजतेने घेतले आणि तुझ्या वासनेला मला दुर करू दिले अशा प्रकारे मला तुच्छ लेखीले आता मी माझी समक्षता तुज पासुन दूर करणार.

अनेक लोक ख्रिस्तांकडे सुरवातीस स्फोटक अशा विश्वासाने येतात परंतु कालातरांने तो उत्साह कमी होत जातो. आणि देवाकडे दुर्लक्ष करू लागतात.ते त्याच्या आज्ञाना किंमत देत नाहीत. आणि त्याच्या पुर्वीच्या पापी मार्गाकडे वळतात. आणि तरी देखील देवाची उपस्थिती त्यांच्या बरोबर आहे. अशा विश्वास बाळगतात नाही - ती लबाडी आहे. संभ्रम आहे! बायबल स्पष्ट करते - तुम्ही जर त्याला सोडाल तर तो तुम्हाला सोडेल!

देवाची अभिवचने कदापी अयशस्वी ठरत नाहीत, परंतु काही- या उपस्थीतीच्या करारा संबंधीत पुर्णत:या अटींवर अवलंबुन आहे. अर्थात देव आमचा त्याग करणार नाही. किवा प्रेम करणे थांबविणार नाही. परंतु जर पापांतच राहीलो तर त्यांची उपस्थिती आमच्या बरोबर जाणार नाही. आणि आपले जीवन त्याच्यासाठी एक शक्तीशाली साधन राहणार नाही. आपण दैहिक जीवनाप्रमाणे झगडणे, धडपडणे ते देखील बळाशिवाय किंवा मार्गदर्शनाशिवाय!.

**केवळ जेव्हा देवाची उपस्थिती आपल्या बरोबर असते, आपण त्यांचे वैभव पाहू शकतो आणि समजु शकतो.**

इस्त्राएल रानात असताना देवाने त्यांना त्यांची उपस्थिती मेघाद्वारे प्रगट केली. हे मेघ देवाने त्यांच्या सोबत राहण्याविषयी दिलेल्या वचनाचे नैसर्गिक प्रकटीकरण होते. ते मेघ खाली उतरत असत. दिवस-रात्र निवासमंडप आच्छादित असत आणि त्यांच्या प्रत्येक गोष्टीबद्दल मार्गदर्शक असे होते. मेघ चाले तेव्हा ते चालत असत आणि मेघ थांबे तेव्हा ते थांबत असत लोकांनी भविष्यातील त्यांच्या दिशा जाणून घेण्याकरीता कमिटी मिटींग घेतल्या नाहीत. त्यांनी देवाची उपस्थिती दर्शविणाऱ्या - समोर दिसणाऱ्या मेघावर भिस्त ठेवली.

आज त्यांच्या उपस्थीतीचा तोच मेघ प्रार्थनेच्या गुप्त जागेवर आच्छादित आहे. तो तुम्हाला त्यांच्या शांती मध्ये गुंढाळण्यासाठी दररोज थांबत असतो. तो तुमचे नेतृत्व करील, सबळ करील आणि शांती देईल आणि तुमच्या गृहाकरीता, कामाकरीता आणि नातेसंबंधिताकरीता तपशीलवार मार्गदर्शन करील.

तुमचे गुप्त स्थळ कोठ असु शकते. - आंघोळीचे ठिकाण, बस मध्ये, कामाचे ठिकाण, घर ते कामाच्या ठिकाणचा प्रवास तुम्ही इतर सर्व विचार बंदीस्त करून असे बोलू शकता, " प्रभु मजकडे आता अर्धातास आहे. येशू मी वर प्रिती करतो. आणि आराधना करीतो हाच माझा तुज सोबतचा एकांततातील समय आहे.

देव सहवासात राहून सुसंगत असे प्रार्थनामय जिवन वाढविणे ही अद्भुत अशी गोष्ट आहे. देव असे अभिवचन देतो की, तुम्ही शोध घेणारे, प्रार्थना करणारे सेवक बनता. त्यावेळी तुमच्या जीवनात त्यांची उपस्थीती प्रवेश करील आणि तुमच्या करीता दरवाजे बंद आणि खुले करून तुमच्या सहभोवताली त्यांचा दैवी क्रम सुरू करेल आणि त्याही पेक्षा अधीक असे घडून येईल - देवाची उपस्थीती तुम्हाला त्यांच्या प्रकटीकरणाकडे नेईल.

देवाची उपस्थिती आणि त्यांचे तेज यात फरक आहे बहुतेक ख्रिस्तीजनांना त्यांची उपस्थिती - त्यांच्या जीवनातील त्यांची महत्कृत्ये ठाऊक आहेत. परंतु थोडक्यांनाच त्याचे तेज ठाऊक आहे. निर्गमाच्या पुस्तकात या फरकाची एक छलक पहावयास मिळते. "मग दर्शन मंडपावर मेघाने छाया केली व निवासमंडप परमेश्वराच्या तेजाने भरून गेला.(निर्गम ४०:३४)

प्रेषित पौल लिहितो की, सर्व विश्वासणाऱ्याचे शरीर देवाचा निवास मंडप आहे. "तुम्ही देवाचे मंदिर आहा आणि तुम्हांमध्ये देवाचा आत्मा वसतो हे तुम्हास ठाऊक नाही काय? (१करिंथ ३:१६)

जागतिक संजीवनाकरिता प्रार्थनेचे आवाहन!

# एको ऑफ हीज कॉलची इतर मंडळया आणि संस्थाच्या सेवा कार्यामध्ये संजीवन यावे यासाठी विशेष जागतिक प्रार्थना दिन!!

आम्ही आमच्या जगभरातील सर्व मित्रांना नम्र विनंतीकरित आहोत, कि १ मे २०२० हा दिवस वेगळा ठरवून सकाळी १० वाजेपासुन ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत एको ऑफ हिज कॉल आणि इतर मंडळया आणि संस्थाच्या सेवा कार्यात संजीवन यावे यासाठी प्रार्थना करावयात. चेन्नाई मध्ये आमच्या मुख्य मंडळीत आम्ही विशेष प्रार्थनो सभेचे आयोजन केले आहे. आम्ही चेन्नाई पासून दूर असणाऱ्याा आमच्या सर्व मित्रांना विनंती करीत आहोत.की या दिवशी या वेळात तुमच्या ठिकाणी प्रार्थना सभेचे आयोजन करावे. प्रार्थनेचे मुद्दे पाठविण्यात येतील. भारताकरीता आणि जगातील इतर देशांकरीता प्रार्थना करण्याची हीच योग्य आणि निश्चित अशी वेळ आहे.

प्रार्थना ही जगाला हालविणाऱ्या हातांना बळ पुरविणारी अशी आहे.

पास्टर एस्. सॅम. सेल्वा राज,

एको ऑफ हिज कॉल

जसे इस्त्रायल जनांनी देवाच्या उपस्थितीच्या मेघाखाली वस्ती केली आपण सतत त्यांच्या कृपा छत्राखाली आहोत. तरी देखील त्यांची उपस्थिती पाहणे आणि त्याचे तेज पाहणे यात काय फरक आहे.

**देवाने मोशेला त्याच्या तेजाचे प्रकटीकरण दिले.**

मोशेने देवाला त्याने त्याच्या उपस्थीतीचे सतत प्रकटीकरण द्यावे अशी प्रार्थनी केली. "..... मला तुझी ओळख घडेल..... " (निर्गम ३३:१३-१४) आणि देवान त्याला उत्तर दिले, " मी प्रत्यक्ष येईन आणि तुला विश्रांती देईन.

मोशेने केलेली विनंती पुष्कळशा विश्वासणाऱ्यांकरीता पुरेशी असेल. आपणा सर्वांना त्यांची उपस्थिती. त्याचे नेतृत्व, मार्गदर्शन, त्याचे सबलीकरण, त्याचे आशिर्वाद हवे आहेत. खरे तर विश्वासणारा यापेक्षी अधिक अशी काय अपेक्षा करणार? मोशेला देवाची उपस्थिती पुरेशी वाटत नव्हती. त्यापेक्षा अधीक आहे त्याला ठाऊक होते. आणि त्याने विनंती केली."कृपा करून मला तुझे तेज दाखीव" (निर्गम ३३:१८)

देवाने मोशेला निश्चितच त्याचे तेज दाखविले परंतु एखाद्या तेजस्वी मेघात किंवा धरणी कंपाच्याद्वारे सामर्थ्य प्रकट केले नाही. नाही देवाने त्याच्या स्वभावाच्या अगदी साध्या प्रकटीकरणाद्वारे प्रकट केले. "परमेश्वर त्याच्या समोरून अशी घोषणा देत गेला. परमेश्वर, परमेश्वर दयाळु व कनवाळू देव मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर हजारो जणांवर दया करणारा अधर्म,अपराध व पाप यांची क्षमा करणारा, मुळीच गय न करणार." (निर्गम ३४:६-७) देवाचे तेज त्यांच्या चागुळपणाचे दयेचे, प्रेमाचे आणि कनवाळू पणांचे प्रकटीकरण होते.

मी अनेक ख्रिस्तीजनांना असे बोलताना ऐकले आहे की, आमच्या मंडळीत मागील रात्री देवाचे तेज प्रगट झाले. अविश्वासनीय स्तुति होती, आणि लोक आत्मयाच्या द्वारे मारले गेले. "परंतु हा काही परमेश्वाराच्या तेजाचा पुरावा नाही. शिवाय मानवी भावनांच्या देवाशी त्याच्या काही संबंध नाही. तो कोण आहे याचा अंतर्भाव प्रकटीकरणात नाही.

मग काहीजण वाद घालतील."रूपातरांच्या डोगरावरील शिष्यांना आलेल्या अनुभवाबद्दल काय? ते देवाच्याा तेजाचे प्रकटीकरण नव्हते का? तेथे अतिशय मोठा प्रकाश होता. मोशे व एलीयाचे चमत्कारीक आगमन किंवा हजेरी होती.

परंतु देवाचे तेज मोशे, एलीया किवा नेत्रदीपक प्रकाश यापैकी कशातही नव्हते तर ते येशू मध्ये होते. "...... त्याचे मुख सुर्यासारखे तेजस्वी झाले. आणि त्यांची वस्त्रे प्रकाशासारखी शुभ्र झाली..... पहा तेजस्वी मेघाने त्याजवर छाया केली. आणि मेघातुन अशी वाणी झाली. हा माझा पुत्र, मला परमप्रिय आहे, याजवर मी संतुष्ट आहे याचे तुम्ही ऐका." (मत्तय १७:२-५)

देव सांगत होता, हे माझे तेज ख्रिस्तामध्ये मुर्तिमंत झाले आहे. अर्थात देवाने मोशेला जे त्याजविषयी सांगितले, तो कृपाळू दयाळू, सहनशील, चांगुलपणात आणि सत्यात भरपुर हजारो जणांवर दया करणारा आणि पापांची क्षमा करणारा हे सर्व ख्रिस्तांमध्ये पुर्णत्वात आहे. "हे माझ्या तेजाचे जीवंत चित्र आहे. ते सर्व माझ्या पुत्रामध्ये सामावलेले आहे.

मी काही ख्रिस्तीजनांना असे बोलताना ऐकले आहे,"देवाने जर मला नुसते नरकाच्या भयंकरतेचे दर्शन दिले तर मी त्याला कदापी सोडणार नाही. मी प्रत्येक दिवस येशूसाठी जगेन!" नाही- अशा दर्शनाने कोणीही कदापी राखला जात नाही. केवळ येशू कोण आहे. त्याचे तेज, कृपा आणि दया आपल्याला पवित्र राखतील. त्यानंतर त्याने त्यांचे जीवन येशूला समर्पित करण्याची शपथ घेतली. परंतु काही आठवडयांतच त्याचे दर्शन संपुष्टात आले आणि तो परत आपल्या जुन्या पापी मार्गावर गेला.

देव आमचे डोळे उघडू इच्छितो - जागृत करू इच्छितो. ".... पवित्र जणांमध्ये त्याने दिलेल्या वैभवाची संपती केवढी..." (इफिस १:१८) तो असे म्हणत आहे. "मोशेला मी प्रकट केलेले सर्व वैभव माझ्या पुत्रामध्ये सामावलेले आहे. आणि आता मी त्याला तुमच्यासाठी वारस असा दिला आहे. तुम्हाला त्याला त्याच्या वैभवात तेजात जाणून घेण्याचा पुर्ण अधिकार आहे."ख्रिस्तांच्या ठायीच देवपणांची पुर्णता मुर्तीमान वसते." (कलसै २:९)

मोशेने देवाचे वैभव तेज जाणून घेण्याच्या दर्शनाची का अपेक्षा केली? मला वाटते त्याचे उत्तर या वचनात आहे. "या स्थळी मी इस्त्रालय लोकांस भेट देईन आणि माझ्या तेजाने ते पवित्र होतील.(निर्गम २९:४३) या ठिकाणी पवित्र होईल याचा अर्थ शुध्द होईल असा आहे. देव म्हणत होता मोशे ज्या वेळी तु आणि सर्व लोक माझी उपासना करतील, मी तुला भेटेन व माझी उपस्थिती तुला देईन.

सर्व वचनांमध्ये हे अतिशय शक्तीशाली प्रबळ असे वचन आहे. ते पापापासून दूर जाण्यास आणि मोकळे व शुध्द होण्यासाठी धडपड करतात त्यांना देव आशा देत आहे. देव प्रतिज्ञा करतो तुझे मंदिर माझ्या वैभवाच्या तेजाच्या प्रकटीकरणाने स्वच्छ होईल आणि ते प्रकटीकरण आताच तुझ करीता माझा पुत्र येशू ख्रिस्त यांज मध्ये उपलब्ध आहे.

ख्रिस्तांचे हे प्रकटीकरण हे आपल्याला कोठे सापडू शकते? ते केवळ त्यांच्या वचनांच्या जवळ आल्यानेच सापडू शकते. पौल म्हणतो, आपण देवाच्या वचनास येशू ख्रिस्तांचे अधिकाधीक प्रतिबिंबित करण्यास परवानगी देतो. तेव्हा आपण वैभवातुन-तेजातून, वैभवात- तेजात बदलून जाऊ, "आपल्या मुखावर आच्छादन असुन आपण सर्वजन आरश्या प्रमाणे प्रभुच्या वैभवाचे प्रतिंबिंब पाडीत आहोत आणि प्रभु जो आत्मा त्याच्या द्वारे तेजस्वितेच्या परंपरेने आपले रूपांतर होत असता

*(पान १० वर .....)*

## एको ऑफ हीज कॉल नेहम्या बायबल कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांची सभा

स्थळ : नेहम्या बायबल कॉलेज १० मोहम्मद अब्दुला २ स्ट्रीट बेलस रोड, चेपॉक, चेन्नई ६०० ००५.

वेळ : १६ मार्च २०२० रोजी सायं. ५.०० ते ७.००

आम्ही आमच्या सर्व एको ऑफ हीज कॉल नेहम्या बायबल कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांना आणि बायबल कोर थियालॉजीकल अभ्यासक्रमाच्या माजी विद्यार्थ्यांना या उपासने करीता आमंत्रित करीत आहोत.

रेव्ह. डॉ. एब रायनर स्टाऊस, प्रिन्सीपल

पास्टर एस्. सॅम. सेल्वा राज,अध्यक्ष

पास्टर ॲलेक्स सॅमसन सॅम, डायरेक्टर

## नेहम्या बायबल कॉलेज दिक्षांत उपासना

कृपया शनिवार १३ जुन २०२० रोजी सायं. ४ वा. बल्हार कल्वी निलायम हॉल, अनिता मॅटरीक्युलेशन स्कूल, रिचर्डडॉन रोड, पुरसवाक्म, चेन्नई - ६०००१०१ येथे होणाऱ्या नेहम्या बायबल कॉलेजच्या दिक्षांत उपासने करीता प्रार्थना करा.



# PIT TO PALACE
# खड्ड्यातून महालापर्यंतची मालिका

**(रेव्ह. सॅम सेल्वा राज यांच्या जीवनांतील अनुभव)**

**“वाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे” (मत्तय २४:१५)**

## “मी तर दीन व दारिद्री आहे, तरी प्रभुला माझी चिंता आहे” (स्तोत्र ४०:१७)

सेहेचाळीस वर्षीपुर्वी चेन्नमध्ये एक मोठी संजीवन सभा झाली होती. दक्षिण आफ्रिकेमधून महान असे प्रवचनकार आले होते. त्यांच्या द्वारे देवाने अदभुत कार्य केले. फार मोठ्या संख्येतील लोकांनी चमत्कार घडलेले पाहिले. आणि त्यांच्या आयुष्यात पहिल्यादांच येशु ख्रिस्तांची सुवार्ता ऐकली. मी त्यांना स्वसेवक म्हणून मदत करीत होतो.

सभांच्या समाप्ती नंतर सर्व पाहुण्यांकरीता आणि सभाच्या यशस्वीतेकरीता ज्या सर्वांनी सहकार्य केले. त्यां सर्वाकरीता सहभागतेची सभा झाली.सभेत अचानक दक्षिण आफ्रिकेच्या प्रमुख व्यक्तीने मला पुढे बोलावून माझी विचारपूस केली. मी सभा करीता जे बॅनर लावले, सभांमध्ये मित्रांचे स्वागत केले. त्याबद्दल त्यांनी माझे कौतुक केले.

त्यांनी मला आणखीन मी कोठून आलो आणि उद्या पहाटे चार वाजता विमानतळावर भेटण्यास येऊ शकशील का याविषयी विचारणा केली.मी त्यांना एवढ्या पहाटे येण्याविषयी असमर्थका व्यक्त केली. कारण माझ्या घरापासुन विमानतळ २५ किलोमीटर अंतरावर आहे. आणि माझ्याकडेजी दुचाकी आहे. ती अतीशय जुनी आहे.

त्यांनी तात्काळ आजुबाजुला नजर फिरवली आणि शहरातील एका प्रसिध्द सुवार्तिकाला पाहिले व त्यांना हाक मारून जवळ बोलाविले. आणि त्यांना म्हटले, हे बंधु सॅम सेल्वा राज आहेत, मी त्यांना सभामध्ये अतिशय उत्तम रीतेने स्वंयम सेवकांचे काम करीत असलेले पाहिले आणि मला त्यांच्यामध्ये विशेष असे काहीतरी दिसते. मला भारत सोडून जाण्याच्या अगोदर विमानतळावर त्यांच्याशी थोडावेळ घालविण्याची इच्छा आहे. ते गरीब आहेत आणि पहाटे विमानतळावर येण्याकरीता त्यांच्याकडे साधन नाही. तुम्ही मला निरोप देण्याकरीता येणार आहात, तर तुमच्या मोटारीतुन त्यांना तुम्ही घेऊन आला तर मला आनंद होईल” परंतु त्या सुवार्तिकांना माझा राग आला आणि त्यांनी त्या प्रमुख व्यक्तींना सांगितले. “यांना विमानतळावर घेऊन येण्यास माझ्याकडे गाडीत जागा नाही.” त्यावर त्यांनी त्याला विचारले की “तुमच्या बरोबर आणखीन कोणी येणार आहेत का?” त्यांनी उत्तर दिले, “नाही, परंतु या गरीब माणसाला मला माझ्या गाडीतुन आणता येणार नाही.”

देवाच्या त्या सेवकांना हे ऐकून आश्चर्यांचा धक्का बसला. त्यांनी मला जवळ बोलावून माझ्या डोक्यावर हात ठेवून प्रार्थना केली की, देवाने मला भौतिक आशीर्वाद, देखील द्यावेत. ते आणखीन मला म्हणाले. “माझ्या प्रिय बंधु सॅम, मला ठाऊक की मी ज्या महान अशा देवाची सेवा करीत आहे. त्या देवाचा तु एक नम्र सेवक आहे. मी तुजसाठी आणि तुझ्या सेवेसाठी समृध्दी उच्चारीत आहे. ज्या देवाची मी सेवा करीत आहे तो आता आकाश कपाटे उघडून तुम्हाला तुमच्या भारतील सेवेकरीता अनेक मोटारी, बसेस आणि इमारत देईल तुम्ही त्या बंधुचा, जो तुम्हाला त्याच्या मोटारीतुन आणण्यास नाकारत त्या बंधुचा द्वेश करू नये.

अनुभवाने मी दु:खी झालो नाही. मी त्या सेवकाच्या मुखातुन निघालेल्या शब्दांबद्दल देवाचे आभार मानिले. दिवस सरून गेले. परंतु देव मला विसरला नाही. कालांतराने देवाने मला वाहन आणि सेवेकरीता लागणाऱ्या सर्व गोष्टी देऊन आशिर्वादात केले. मला माझ्या सहकाऱ्यांना त्याच विमानतळावर स्वत:च्या वाहनाने जाणे शक्य होऊ दिले. किती अद्‌भुत असा देव लाभलेला आहे.? तो देव आज देखील जिवंत आहे. तो काल, आज आणि सर्वकाळ सारखाच आहे.

माझ्या प्रिय वाचका, तुझ्या मस्तकावर असलेला अभिषेकाल इतक कोणी ओळखित नाही, त्याबद्दल तु असमाधानी आहे काय? तुझ्या सध्याच्या खालावलेल्या परीस्थीतीकडे पाहून तू नाउमेद झाला आहेस काय. तुझ्याच लोकांनी तुला कमी लेखीले आहे का? देव म्हणत आहे. “तुमचे अंतकरण अस्वस्थ होऊ नये..... मी तुला सुखा शिवाय नसलेला असा सोडणार नाही. मी तुजकडे येईन” (योहान १४:१,१८) त्यांच्या इच्छेनुसार जिवन जगा. देव तुम्हांला आशिर्वाद देवो.

❖ ❖ ❖


## Echo of His Call Postal Course

**BIBLECOR**

We offer a Postal Course on Basic Truths of The Bible to new christians and non-christians in English, Hindi & Tamil. You will get a course book entitled **New Life – For You!** with about 70 pages. After the completion of this course, you will get a certificate. **There will be no compulsory fees**. This courses is for candidates in India only.

***For more details, write to us.***

**The Chairman, Nehemiah Bible College, Echo of His Call**
10, Mohammed Abdullah 2nd Street, Opp. Cricket Stadium,
Chepauk, Chennai - 600 005, India.
**Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766, Cell : (+91) 95661 31858, 97908 05460 E-mail : biblecor@yahoo.co.in**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/18-20

# ECHO OF HIS CALL

Monthly magazines in 16 languages, Bible Colleges, Postal Courses, Church Planting, Village English High School, Gospel Printing Press, Crusades, Seminars, Social Services, etc.

**Annual Subscription : Rs. 100/-**
**Life Subscription : Rs. 2000/-**

The Multifarious activities of **Echo of His Call Ministry** is supported by the free-will offeerings and donations of the God's children like you. You may support Echo of His Call and its activities as the Lord leads you. We need your help to send forth the Gospel to the unreached people and plant Churches.

If you would like to receive **ECHO OF HIS CALL** magazines regularly, please write to us. Whenever you change your postal or e-mail addresses, please do inform us your old and new address.

**Echo Of His Call** is available in 16 langues in our websites also. You can read it by going into the site as well as downloading it and get bleassed.

Your letters, prayer requests and your financial helgs (by D.D., Cheque, M.O. etc) to **ECHO OF HIS CALL** may be seat to the address below

Please send your **Land Phone / Cell Phone Numbers and E.mail addresses far updation.**


## ECHO OF HIS CALL

10, MOHAMMED ABDULLAH STREET, CHEPAUK
CHENNAI-600 005, INDIA
PH:(+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
**CELL : (+91) 95661 31858 / 97908 05460**
E-mails: sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org/
www.echoofhiscall.com
YOU CAN SEND YOUR DONATIONS ON ONLINE ALSO


*(पान ८ वरुन .....)*

आपण त्यांच्याशी समरूप होत आहो.(२ करिंथ ३:१८)

हे देवाच्या तेजाचे प्रकटीकरण आपल्याला जीवन राखण्याचे, जीवन रक्षिण्याचे सामर्थ्य पुरविल....... त्यांच्या सर्व वैभवावर छत्र होईल. (यशया ४:५) दुसऱ्या शब्दांत देवाचे तेज आपल्या वाईट वेळेत आपल्याला स्वच्छ ठेवील. सैतान कदाचित आपल्याला," तु हारला आहेस ! तु फरसविणारा, लबाड आणि व्याभिचारी आहेस." असे म्हणून लबाडी करेल, परंतु आपण त्याला असे उत्तर देऊ शकु की नाही.सैताना माझ्यासाठी एक महा याजक आहे. आणि मी त्यांच्या तेजाच्या दर्शनाने शुध्द केला गेलेलो आहे.

देवाने मोशेला त्यांच्या स्वभावा विषयी या सर्व गोष्टी प्रकट केल्या.त्यावेळेस त्याला पुर्ण प्रकटीकरण देखील दिले की, "..... तो मुळीच गय न करणारा.....आहे." (निर्गम ३४:७) अजऱ्याने आसा राजास त्याच्या अतिशय समृध्दिच्या अवस्थेत भविष्य केले, ".... तुम्ही त्यास सोडाल तर तो तुम्हांस सोडील." (२ इतिहास १५:२)

देव आम्हांला येथे सांगत आहे. ते अतिशय साधेसोपे आहे. " माझ्या पुत्राला ओळखण्यास वेळ द्या.! माझी वचने शोधा आणि तुमच्या प्रार्थनेच्या गुप्त स्थळी मला हाक मारा. मग तुम्ही माझ्या उपस्थितीत असताना माझे तेज पाहण्यास तुमचे डोळे उघडू लागतील. ते सर्व ख्रिस्तांमध्ये प्रकट केलेले आहे. तो माझ्या प्रिती, कृपा, दया आणि कनवाळु पणाचे पुर्ण प्रकटीकरण आहे.

"तुम्ही सतत या प्रकटीकरणावर प्रतिबिंबित राहाल तेव्हा मी तुम्हांस स्वच्छ करून, शुध्द करीन - कारण तुम्ही अधिकाधीक येशू सारखे व्हाल जेव्हा तो तुमच्या बद्दल किती प्रेमळ आणि दयाळू आहे. हे तुम्ही पहाल तेव्हा तुम्ही इतरांसाठी अधिक प्रेमळ आणि दयाळू बनाल, आणि ते तुमच्या मध्ये माझे तेज प्रकट केल्यासारखे होईल."

प्रियानो, चिन्हांची अपेक्षा करणे थांबवा, तुमची मंडळीची इमारत कोणत्याही तरी शक्तीने हादरण्याची आपेक्षा करणे थांबवा किंवा कोणत्या तरी उपदेशकाने तुमच्या डोक्यावर हात ठेवून तुमच्या सर्व समस्या सोडविल्याचा जाण्याची अपेक्षा करू नका." केवळ प्रभुलाचा शोधा! त्याचे वचन ते स्पष्ट करते. "परमेश्वांचे नेत्र अखिल पृथ्वीचे निरीक्षण करीत असतात, जे कोणी सात्विक चिंत्ताने त्यांच्याशी वर्ततात. त्याचे सहाय्य करण्यास तो आपले सामर्थ्य प्रकट करतो." (२ इतिहास १६:९)

संपुर्ण ह्दयाने त्याचा शोध घ्या आणि तुमच्या दररोजच्या जीवनात त्याच्या उपस्थितीची इच्छा बाळगा. तेव्हा तुम्हांला देवाच्या अविश्वनीय अशा तेजाचा अनुभव होईल.!


**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/18-20**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th SEPTEMBER 2020**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**


***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from No.18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers** No. 18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**